12 JUN 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात डॉ. बापूजी साळुंखे जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभाग परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर, शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना प्र. सोनकांबळे, गणित अधिविभाग प्रमुख डॉ. मच्छिंद्र गोफणे, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे आणि अधिविभागातील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

12 JUN 2026 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ललित कला विद्यापीठासाठी प्रस्ताव मंजुराच्या मार्गावर

- शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची माहिती

प्रतिनिधी, कोल्हापूर

कला नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापुरात ललित कला विद्यापीठासाठीचा प्रस्ताव मंजुरीच्या मार्गावर असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.

ओल्ड इज गोल्ड संस्थेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू स्मारकमध्ये निसर्ग चित्र आणि नारळापासूनच्या कलाकृतींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रवींद्र ओबेराय होते.

चित्रकलेच्या विविध अंगांचा अभ्यास आणि नारळाच्या करवंटीपासूनची कलाकृती यांचा



कोल्हापूर : ओल्ड इज गोल्ड संस्थेच्या वतीने भरविण्यात आलेल्या निसर्ग चित्र आणि नारळापासूनच्या कलाकृतींच्या प्रदर्शनातील कलाकृती पाहताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत.

अनोखा संगम पहावयास मिळाला. जे. जे. स्कूलप्रमाणे शिवाजी विद्यापीठामार्फत कलाकारांचा मेळावा घेण्यासाठी नक्की विचार करू, असेही कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

प्रदर्शनात चित्रकार शिवाजी मस्के, वारली चित्र कलाकार एल. एम. गडगे आणि प्रेस फोटोग्राफर मोहन मेस्त्री यांनी नारळापासून केलेल्या कलाकृतींचा समावेश आहे. रविवार (दि. १४) पर्यंत हे प्रदर्शन आहे. कार्यक्रमास उद्योजक जयेश ओसवाल, ॲड. पद्माकर कापसे, प्रा. संजय गायकवाड, सागर बगाडे, सुभाष वाणी, जगन्नाथ भोसले, आदी उपस्थित होते. प्रास्ताविक शिवाजी मस्के यांनी केले. प्रकाश अवघे यांनी परिचय करून दिला. आप्पासाहेब पाटील यांनी आभार मानले.

1 2 JUN 2026

जनप्रवास

# ललित कला विद्यापीठासाठीचा प्रस्ताव मंजुरीच्या मार्गावर : कुलगुरु

**जनप्रवास : कोल्हापूर**

कोल्हापुरातील ज्येष्ठ कलाकारांचा कला मेळावा नक्कीच कौतुकास्पद आहे. चित्रकलेच्या विविध अंगांचा अभ्यास आणि नारळाच्या करवंटी पासूनची कलाकृती यांचा अनोखा संगम बुधवारी बघायला मिळाला. जे जे



स्कूल ऑफ आर्ट प्रमाणे शिवाजी विद्यापीठामार्फत विविध ऋतुंच्या आगमन प्रसंगी कलाकारांचा मेळावा घेण्यासाठी नक्की विचार करू, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी केले. ओल्ड इज गोल्ड संस्थेतर्फे आयोजित निसर्ग चित्र आणि नारळा पासूनच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रवींद्र ओबेराय होते.

येथील शाहू स्मारक भवनमध्ये चित्रकार शिवाजी मस्के, वारली चित्र कलाकार एल. एम. गडगे आणि फोटोग्राफर मोहन मेस्त्री यांच्या नारळापासून केलेल्या कलाकृतीचे प्रदर्शन आयोजित केले आहे. रविवार, १४ तारखेपर्यंत हे प्रदर्शन चालणार आहे,

कार्यक्रमासाठी उद्योजक जयेश ओसवाल, ॲड. पद्माकर कापसे, प्रा. संजय गायकवाड, सागर बगाडे, सुभाष वाणी, जगन्नाथ भोसले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक शिवाजी मस्के यांनी केले. प्रकाश अथण यांनी परिचय करून दिला. यावेळी वयाच्या साठीतही परीक्षा देऊन पीएलसी डिप्लोमा केल्याबद्दल सुभाष वाणी यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आभार आप्पासाहेब पाटील यांनी मानले.

12 JUN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनप्रवास

# विभागीय सहसंचालक कार्यालय परिसरात २५१ वृक्षलागवड

जनप्रवास : कोल्हापूर

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हापुरात विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या परिसरात २५१ वृक्षलागवड करण्यात आली. कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्या हस्ते उपक्रम घेण्यात आला. ६७ विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

मंत्री चंद्रकांत पाटील यांचे नावाने वडाचे झाड लावले असून, त्याचे नामकरण छत्र-छाया वृक्ष असे करण्यात आले. कुलगुरु यांचे नावे वृक्ष लावण्यात आले, त्यास कुलगुरु वृक्ष असे नामकरण करण्यात आले.

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण, कोल्हापूर) डॉ. प्रकाश बच्छाव यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी या विशेष उपक्रमाची पूर्वपीठिका विशद करताना ६७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून ६७ प्रजातींची निवड करण्यामागचा उद्देश आणि २५१ वृक्षलागवडीचे सविस्तर नियोजन यावर प्रकाश टाकला.

डॉ. कामत म्हणाले, मंत्री पाटील यांनी राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गरजू मुलींना उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले करून देण्यासाठी घेतलेला 'मुलींना मोफत शिक्षण' हा निर्णय अत्यंत ऐतिहासिक आणि क्रांतिकारी



ठरला आहे. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रवीण कोडोलीकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान आणि श्रमदानः या संपूर्ण वृक्षलागवड मोहिमेमध्ये विविध महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेनाच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने आणि श्रमदानातून मोठे साहाय्य केले. राजाराम कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, धनंजयराव गाडगीळ कॉलेज, भोगवती कॉलेजने सहभाग नोंदवला. या पर्यावरणपूरक कार्यक्रमाला विद्यापीठाचे अधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JUN 2026 पुण्यनगरी

# अभियंत्यांनी उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करावी

## डॉ. राजाराम गुरव : विद्यापीठात 'पायपिंग अँड प्रोसेस प्लांट इंजिनीअरिंग'वरील कार्यशाळा उत्साहात



कोल्हापूर : प्रतिनिधी

अभियांत्रिकी शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित राहू न देता उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. तांत्रिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियांचे आकलन आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत मोठी भर घालते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील केमिकल इंजिनीअरिंग विभागामार्फत केंद्र सरकारच्या पीएम-उषा योजनेंतर्गत आयोजित 'पायपिंग अँड प्रोसेस प्लांट इंजिनिअरिंग : कॉन्सेप्ट टू कमिशनिंग' या तीन दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयआयटी (मुंबई)चे सर्टिफाईड पायपिंग इंजिनिअर नितीन जी. नागेश्वर उपस्थित होते.

कार्यशाळेचा समारोप सोमवारी अंतिम परीक्षा व प्रकल्प सादरीकरणानंतर झाला. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख तथा कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रवीणकुमार पाटील होते. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग उद्योग क्षेत्रातील आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी करावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

12 JUN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उद्योगांशी सुसंगत कौशल्ये आत्मसात करा

## डॉ. आर. व्ही. गुरव : विद्यापीठात पायपिंग इंजिनिअरिंगवर कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ११ : अभियांत्रिकी शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित राहून न घेता उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत. तांत्रिक ज्ञानासह प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियांचे आकलन, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत मोठी भर घालते, असे शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील केमिकल इंजिनिअरिंग विभागातर्फे केंद्र सरकारच्या पीएम-उषा योजनेंतर्गत घेतलेल्या 'पायपिंग अँड प्रोसेस प्लांट इंजिनिअरिंग : कॉन्सेप्ट टू कमिशनिंग' या तीनदिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर, तर आयआयटी मुंबईचे सर्टिफाइड पायपिंग इंजिनिअर नितीन जी. नागेश्वर उपस्थित होते.

कार्यशाळेतील बारा सत्रांमध्ये प्रोसेस डिझाइन, प्रेशर व्हेसल कॅल्क्युलेशन, मटेरियल स्पेसिफिकेशन्स यांसारख्या महत्त्वपूर्ण औद्योगिक बाबींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. प्रवीणकुमार पाटील होते.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 JUN 2026

जनप्रवास

# अभियंत्यांनी उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करावीत

## डॉ. राजाराम गुरव : विद्यापीठात 'पायपिंग अँड प्रोसेस प्लांट इंजिनिअरिंग'वरील कार्यशाळा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शन करताना अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव. मंचावर डॉ. नितीन नागेश्वर, डॉ. अजित कोळेकर, डॉ. प्रवीणकुमार पाटील आदी.

जनप्रवास : कोल्हापूर

अभियांत्रिकी शिक्षण केवळ पदवीपुरते मर्यादित राहून न घेता उद्योगांच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. तांत्रिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष औद्योगिक प्रक्रियांचे आकलन आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत मोठी भर घालते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील केमिकल इंजिनिअरिंग विभागामार्फत केंद्र सरकारच्या पीएम-उषा योजनेंतर्गत आयोजित "पायपिंग अँड प्रोसेस प्लांट इंजिनिअरिंग: कॉन्सेप्ट टू कमिशनिंग" या तीन दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयआयटी (मुंबई) चे सर्टिफाइड पायपिंग इंजिनिअर नितीन जी. नागेश्वर उपस्थित होते.

कार्यशाळेत प्रोसेस डिझाइन, प्रेशर व्हेसल कॅल्क्युलेशन, मटेरियल स्पेसिफिकेशन्स, अत्याधुनिक सॉफ्टवेअर टूल्स, प्लांट कमिशनिंग, हॅझॉपसुरक्षा प्रणाली तसेच प्लांट मेंटेनन्स यांसारख्या महत्त्वपूर्ण औद्योगिक बाबींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना विविध संकल्पनांची प्रात्यक्षिकांसह सखोल माहिती देण्यात आली.

### ज्ञानाचा उपयोग आव्हाने पेलण्यासाठी करावा

यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण केले. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग उद्योग क्षेत्रातील आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी करावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

कार्यशाळेचा समारोप सोमवारी (दि.८) अंतिम परीक्षा व प्रकल्प सादरीकरणानंतर झाला. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केमिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख तथा कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रवीणकुमार पाटील होते.

12 JUN 2026

सकाळ



कोल्हापूर : स्वरसांगाती संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात दीपाली दातार यांचा सत्कार झाला.

# 'तळ्यातले आकाश' काव्यसंग्रहावर गप्पा

कोल्हापूर : स्वरसांगाती संस्थेच्या वतीने कदंब पुरस्कारप्राप्त पुणे येथील दीपाली दातार यांच्या 'तळ्यातले आकाश' या काव्यसंग्रहातील कविता सादरीकरण आणि काव्यप्रवासाबाबत गप्पांचा कार्यक्रम झाला. निकम पार्क येथे झालेल्या कार्यक्रमात दातार यांनी या काव्यसंग्रहातील 'गेय कविता', 'गझल', 'मुक्तछंद', 'क्षणिका' अशा विविध काव्यप्रकारांचे सादरीकरण केले. त्याचबरोबर 'रुबाया' या नव्या काव्यप्रकाराचे गेय सादरीकरण संगीतकार मुकुंद दातार यांनी केले. प्रसाद कुलकर्णी यांनी प्रस्ताविक केले. शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांच्या हस्ते दातार यांचा सत्कार झाला. शीतल धर्माधिकारी यांनी गायलेल्या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. डॉ. विनायक भोई यांनी आभार मानले.

तरुण भारत संवाद | कोल्हापूर
शुक्रवार १२ जून २०२६

लक्षवेधी | एल-निनो, समुद्राच्या तापमानातील बदल, वातावरणातील असमतोलामुळे मान्सून अधिक अनिश्चित

# युद्धामुळे होणार प्रदूषण पर्यावरणासाठी धोकादायक

प्रतिनिधी, कोल्हापूर

[illegible]



## सरासरी तापमानात १.५ सेल्सिअसने वाढ

औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलतोड आणि जीवाश्म इंधनांचा वाढता वापर यामुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. संयुक्त राष्ट्रसंघ आणि जागतिक हवामान संघटनेच्या अहवालानुसार पृथ्वीचे सरासरी तापमान औद्योगिक क्रांती पूर्व काळाच्या तुलनेत सुमारे १.५ अंश सेल्सिअसने वाढले आहे. ही वाढ दिसायला लहान वाटत असली तरी तिचे परिणाम अत्यंत गंभीर आहेत.

- शस्त्रे, क्षेपणास्त्रातून निघणाऱ्या विषारी वायूचा परिणाम
- पर्यावरण तज्ज्ञांचे सर्वेक्षण

[illegible]

### युद्ध आणि त्यांचा पर्यावरणावर होणारा परिणाम

[illegible]

### युद्धाचे परिणाम मानवजातीपर्यंत

युद्धामुळे वाढणारे उत्सर्जन आणि पर्यावरणीय हानी दीर्घकालीन हवामान बदलाला चालना देतात. हवामान बदल अधिक तीव्र झाला की मान्सूनची अनिश्चितता वाढते. विकास, सुरक्षा आणि पर्यावरणाच्या समतोल साधण्याची गरज आहे. पृथ्वीवरील कोणतेही युद्ध सीमारेषांमध्ये अडकून राहत नाही, त्याचे परिणाम हवा, पाणी, अन्न आणि हवामानाच्या माध्यमातून संपूर्ण मानवजातीपर्यंत पोहोचतात.

- डॉ. [illegible], सहाय्यक प्राध्यापक, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

[illegible]

1 2 JUN 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ११ जूनरोजी विविध १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ३६ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षांसाठी २,१७८ विद्यार्थी उपस्थित होते. ११ जूनरोजी विविध ४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले असून आजअखेर ६७२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत. ११ जूनरोजी सदर पथकाकडून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद झाली नाही.

12 JUN 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठाच्या ३१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. १० जूनरोजी विविध ३१ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ४५ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या असून सदर परीक्षांसाठी ५६४५ विद्यार्थी उपस्थित होते. १० जूनरोजी विविध ६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर ६६८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत.

1 2 JUN 2026
पुढारी

# ६७२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ६७२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. सध्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत.